मंगळवार, १४ डिसेंबर २०२१

◆ वर्ष १४ ◆ अंक १४७
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## ओमायक्रॉन व्हेरिएंटचा जगात पहिला बळी



**नवी दिल्ली :** कोरोना महामारीने संपूर्ण जगाला मागील दोन वर्षांपासून विळखा घातला आहे. हा विळखा मागील काही महिन्यांत सैल होत आहे, असे वाटत असतानाच ओमायक्रॉन या नव्या व्हेरिएंटने जन्म घेतल्याने संपूर्ण जगाची चिंता पुन्हा वाढली आहे. दरम्यान, ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी युकेमध्ये ओमायक्रॉनची लागण होऊन किमान एका रुग्णाचा जीव गेल्याची माहिती दिली आहे. या माहितीमुळे ओमायक्रॉनही जीवघेणा असल्याचे समोर आल्याने जगभरातील नागरिकांची चिंता वाढली आहे. भारतातही ओमायक्रॉनने शिरकाव केला आहे. भारतात ओमायक्रॉन व्हेरिएंटच्या रुग्णाची संख्या वाढतच चालली आहे. रविवारपर्यंत देशातील एकूण ओमायक्रॉन व्हेरिएंटच्या रुग्णाची संख्या ३७वर पोहचली आहे. यामध्ये सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रातील आहेत.


### अंतरंग

'त्या' वक्तव्यावरून राहुल गांधींना भाजपचे आव्हान/२

दूषित पाणीपुरवठ्यामुळे कामोठेकर हैराण/३

माथेरानमधील 'त्या' हत्येचे रहस्य उलगडले/५


## भव्य काशी, दिव्य काशी सोहळा देशभरात उत्साहात साजरा

# भारतीय भूमी शूर योद्ध्यांची

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन



**श्री काशी विश्वनाथ कॉरिडोरचे लोकार्पण**

**वाराणसी : वृत्तसंस्था**

भारत देशाची माती जगापेक्षा वेगळी आहे. याच महान भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांसारखे शूर आणि पराक्रमी राजे निर्माण झाले. औरंगजेबासारख्यांचे मनसुबे त्यांनी उधळून लावले. ही आपली शूरांची भूमी आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. ते वाराणसीत श्री काशी विश्वनाथ धामचे (कॉरिडोर) लोकार्पण सोहळ्यात बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दोन दिवसांच्या वाराणसीच्या दौऱ्यावर आहेत. सोमवारी वाराणसीत दाखल झाल्यावर त्यांनी गंगा स्नान करून काशी विश्वेश्वराची पूजा केली. पंतप्रधान मोदींसोबत या वेळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही होते. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण देशातील अनेक ठिकाणी करण्यात आले. यानंतर पंतप्रधान मोदींनी श्री काशी विश्वनाथ कॉरिडोरच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण केले. या वेळी पंतप्रधान मोदींनी संवाद साधला.

श्री काशी विश्वानाथ कॉरिडोरच्या पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून त्यासाठी ३३९ कोटी रुपये इतका खर्च आला आहे. २ वर्षे आणि ९ महिन्यांत हे काम पूर्ण करण्यात आले आहे. पंतप्रधान मोदींनी काशी विश्वनाथ कॉरिडोरसाठी काम करणाऱ्या मजुरांचा गौरव केला.

काशी विश्वेश्वराच्या पूजेनंतर पंतप्रधान मोदींनी काशी विश्वनाथ धामचे (कॉरिडोर) लोकार्पण केले. या वेळी पंतप्रधान मोदींनी संवाद साधला. हर हर महादेव म्हणत पंतप्रधान मोदींनी भाषणाला सुरुवात केली. काशी विश्वनाथ कॉरिडोरसाठी जागा देणाऱ्या काशीतील जनतेचे, उत्तर प्रदेश सरकार आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या टीमचे पंतप्रधान मोदींनी या वेळी अभिनंदन केले.

ते पुढे म्हणाले की, काशीत फक्त एकच सरकार आहे. ज्याच्या हाती डमरू आहे, अशा काशी विश्वेश्वराच्या इच्छेशिवाय इथे एकही पान हालत नाही. काशी विश्वनाथ कॉरिडोर होणं ही काशी विश्वेश्वराचीच इच्छा आहे आणि वाराणसीच्या जनतेने ती पूर्ण केली आहे. काशी विश्वेश्वराच्या म्हणजेच महादेवाच्या मर्जीशिवाय इथे कोणी येऊ शकत नाही आणि इथे कोणाची चालत नाही, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

## पनवेलमध्येही ठिकठिकाणी थेट प्रक्षेपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या काशी विश्वनाथ धामच्या लोकार्पण सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी पनवेलमध्ये ठिकठिकाणी या सोहळ्याच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत शहरातील विरुपाक्ष मंदिरात आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थितीत लाभली. या वेळी आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात श्री दत्त मंदिराचे मठाधिपती दादा वाघीलकर, नवनाथ मंदिराचे मठाधिपती विजय जी. पानसरे, ज्येष्ठ कीर्तनकार नंदकुमार कर्वे, सुनीता खरे, शेखर रानडे यांचा सत्कार करण्यात आला. **(पान २ वर..)**

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



## गाढी नदीवरील नवीन पुलाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुक्याचा सर्वांगीण विकास होत असून, विकास कामांचा झंजावात सुरू आहे. त्या अंतर्गत सुकापूर ते देवद या गाढी नदीवरील नवीन पुलाचे काम सुरू झाले आहे. या कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १३) झाले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, प्रकल्पाच्या सुरुवातीबरोबर येणाऱ्या कालावधीत सिडको आणि नैनाने जर सकारात्मक भूमिका घेतली, तर परिसरातील नागरिक या नियोजनबद्ध विकासाला प्रतिसाद देतील. तसेच नागरिकांच्या विकासकामांबाबत सिडकोबरोबर चर्चा करू आणि गरज भासली, तर संघर्ष करून परिसराच्या, नागरिकांच्या हितासाठी काम करावे लागणार आहे. त्या दृष्टिकोनातून या परिसरातील नागरिकांचे पाठबळ लाभेल, अशी खात्रीही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केली.

सिडकोच्या नैना प्राधिकरणाचा १० कोटी ११ लाख ४४ हजार रुपयांचा निधी वापरून सुकापूर ते देवद या मार्गावरील गाढी नदीवर पूल उभारण्यात येणार आहे. सुकापूर येथील गंगा गणेश सोसायटीजवळील गणेश विर्सजन घाटाजवळ या कामाचा भूमिपूजन सोहळा सोमवारी झाला.

या सोहळ्याला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, पनवेल महापालिकेचे नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, नगरसेविका अ‍ॅड. वृषाली वाघमारे, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, सुकापूर सरपंच योगिता पाटील, देवद सरपंच शीतल सोनावणे, युवा मोर्चा ग्रामीण अध्यक्ष आनंद ढवळे, ज्येष्ठ कार्यकर्ते वामन म्हात्रे, अ‍ॅड. जितेंद्र वाघमारे, माजी उपसरपंच बुवा भगत, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, ज्ञानेश्वर पाटील, युवा नेते यतीन पाटील, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, सरचिटणीस उदय म्हस्कर, महेश केणी, युवा मोर्चाचे आत्माराम पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, दिनेश भगत, पुष्पा म्हस्कर, अनिता पाटील, पूनम भगत, कविता पोपेटा, ज्योती केणी, विनोद वाघमारे, दिनेश वाघमारे, युवा नेते संदीप वाघमारे, निलेश वाघमारे, अविनाश गायकवाड, प्रमोद भगत, दीपक भगत, साजीद सय्यद आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### निवडक

#### २१ वर्षांनी भारताने जिंकला 'मिस युनिव्हर्स २०२१'चा ताज

**नवी दिल्ली :** 'मिस युनिव्हर्स २०२१'चा किताब भारताच्या हरनाझ संधूने जिंकलाय. २१ वर्षीय हरनाझला १२ डिसेंबर रोजी इस्रायलच्या इलात येथील युनिव्हर्स डोममध्ये मिस युनिव्हर्सचा मुकुट देण्यात आला. तब्बल २१ वर्षांनंतर भारताला मिस युनिव्हर्सचा किताब मिळाला आहे. तिच्या आधी २१ वर्षांपूर्वी लारा दत्ताने २००० साली मिस युनिव्हर्सचा किताब जिंकला होता.

#### श्रीनगरमध्ये दहशतवादी हल्ला; दोन जवान शहीद

**श्रीनगर :** श्रीनगरमध्ये एका पोलीस बसवर हा दहशतवादी हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत दोन जवान शहीद झाले असून, अन्य १२ जवान गंभीर जखमी झाले आहेत. हा हल्ला श्रीनगरमधील पंथा चौक परिसरात झेवानजवळ सोमवारी (दि. १३) सायंकाळी झाला. या हल्ल्यात जखमी झालेल्यांना तातडीने स्थानिक रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## परीक्षा रद्द झाल्याने आव्हाडांच्या घरासमोर 'अभाविप'चे आंदोलन

### राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलनकर्त्यांना मारहाण

**ठाणे : प्रतिनिधी**

म्हाडाची परीक्षा रद्द झाल्यामुळे भाजपप्रणीत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) कार्यकर्त्यांनी सोमवारी (दि. १३) गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांच्या ठाण्यातील निवासस्थानाबाहेर जोरदार आंदोलन केले. या वेळी अभाविप आणि राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला. पोलीस आणि राष्ट्रवादीच्या गुंडांकडून आम्हाला मारहाण करण्यात आल्याचा आरोप अभाविपच्या कार्यकर्त्यांनी केला.



अभाविपच्या कार्यकर्त्यांनी सकाळी जितेंद्र आव्हाड यांच्या निवासस्थानी आव्हाड यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्तेही प्रचंड संतापले. त्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात घोषणाबाजी सुरू होती. या वेळी पोलीस आणि राष्ट्रवादीच्या गुंडांकडून आम्हाला मारहाण करण्यात आल्याचा आरोप अभाविपच्या कार्यकर्त्यांनी केला. पोलिसांनी हस्तक्षेप करत अभाविपच्या आंदोलकांना ताब्यात घेतले. पोलीस जितेंद्र आव्हाडांच्या इशाऱ्यानुसार काम करत आहेत. म्हाडा पेपरफुटीप्रकरणात जितेंद्र आव्हाड यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी अभाविपच्या कार्यकर्त्यांनी केली.

## लोकांवर अरेरावी करण्यासाठी राज्य दिलेले नाही : राज ठाकरे

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाच्या आणि कर्मचाऱ्यांना परिवहनमंत्री अनिल परब यांनी दिलेल्या अल्टिमेटमच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथे पत्रकार परिषदेत बोलताना अनिल परब यांच्यावर निशाणा साधला.

एसटीचा विषय आपण नीट पाहणे आवश्यक आहे. मला जी माहिती मिळाली आहे, त्याप्रमाणे चुकीचे असे मला वाटत नाही. या सगळ्यामध्ये एसटी कर्मचारी सर्व संघटना बाजूला करून एकवटले आहेत. तुमच्या हातात जे राज्य दिलेले आहे ते लोकांसाठी दिलेले आहे. लोकांवर अरेरावी करण्यासाठी राज्य दिलेले नाही, असे राज ठाकरे म्हणाले.




### पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. १४ डिसेंबर २०२१ रोजी होणारे**

## कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. काळण समाज हॉल, पनवेल
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- आसूडगाव रा.जि.प. शाळा
- रोडपाली रा.जि.प. शाळा
- ओवे कॅम्प गाव रा.जि.प. शाळा
- पापडीचा पाडा रा.जि.प. शाळा
- रांजणपाडा रा.जि.प. शाळा
- धरणा कॅम्प रा.जि.प. शाळा
- इनामपुरी रा.जि.प. शाळा
- पिसार्वे रा.जि.प. शाळा
- फरशीपाडा रा.जि.प. शाळा
- न्यु इंग्लिश स्कूल कळंबोली


## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये बक्षीस व सत्कार समारंभ



(छाया : दिगंबर भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या वतीने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा निवड चाचणीचा बक्षीस समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी (दि. १२) आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेत सिद्धार्थ दास याने प्रथम क्रमांक पटकावला. या वेळी मान्यवरांचा सत्कार सोहळाही झाला.

उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि रायगड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनच्या माध्यमातून जिल्हास्तरीय स्पर्धा, निवड चाचणीचा बक्षीस वितरण समारंभ आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशन उपाध्यक्ष प्रदीप गंधे यांना मेजर ध्यानचंद पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल, तसेच सचिव सुंदर शेट्टी यांना बीडब्लूएफ पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार समारंभाचे आयोजन रविवारी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये करण्यात आले होते. **(पान २ वर..)**




# हिंदू आहात तर मोगलांनी मंदिरांवर केलेल्या आक्रमणाचा निषेध करा!

## चंद्रकांत पाटील यांचे राहुल गांधी यांना आव्हान



**पुणे : प्रतिनिधी**

काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष राहुल गांधी यांनी आपण हिंदू असल्याचे सांगितले असले, तरी हिंदू आणि हिंदुत्व असा त्यांचा संभ्रम झाला आहे. ते हिंदू असल्याचे सांगतात तर त्यांनी मोगलांनी हिंदू मंदिरांवर केलेल्या आक्रमणाचा निषेध करावा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्याप्रमाणे मंदिरांची पुनर्स्थापना करत आहेत त्याप्रमाणे कार्य करावे, असे आव्हान भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी (दि. १३) राहुल गांधी यांना दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काशी येथील विश्वनाथ मंदिराच्या परिसरातील भव्य विकासकामांचा लोकार्पण कार्यक्रम मोठ्या स्क्रीनवर पाहण्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती. पुण्यात हडपसर परिसरात मांजराई देवी मंदिराच्या आवारात या कार्यक्रमात भाग घेतल्यानंतर मा. प्रदेशाध्यक्ष पत्रकारांशी बोलत होते. राहुल गांधी यांनी आपण हिंदू आहोत पण हिंदुत्ववादी नाही, असे वक्तव्य केल्याबद्दल एका पत्रकाराने प्रतिक्रिया विचारली असता त्यांनी वरील आव्हान दिले.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, राहुल गांधी यांचे वक्तव्य त्यांचा संभ्रम दर्शविते. हिंदू आणि हिंदुत्ववादी यात काय फरक आहे? हिंदू धर्म म्हणजे विशिष्ट एकच पूजा पद्धती नाही, तर हिंदू हा गुणवाचक शब्द आहे. जो हिंदू तत्त्वज्ञानाचा आग्रही असतो तो हिंदुत्ववादी असतो. या देशात हिंदू समाजात वेगवेगळ्या पूजा पद्धती निर्माण झाल्या आणि मंदिरे निर्माण झाली. त्यावर मोगलांनी आक्रमण केले. राहुल गांधी स्वतःला हिंदू म्हणत असतील, तर त्यांनी मोगलांनी मंदिरांवर केलेल्या आक्रमणाचा निषेध केला पाहिजे.

त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सच्चे भारतीय आणि सच्चे हिंदुत्ववादी आहेत. काशीला गंगेत स्नान करून विश्वनाथ मंदिरात दर्शनाला येताना प्रचंड गर्दी होत होती आणि मंदिराभोवती प्रदूषण व सांडपाणी होते. ते हटविण्याचा संकल्प त्यांनी पूर्ण केला. आता मंदिराच्या भोवती पाच लाख चौरस फुटांचा सुंदर परिसर निर्माण झाला आहे. भाविकांना मोकळेपणाने वावरण्यासाठी जागा आहे. गंगेत स्नान करून भाविक थेट मंदिरात येऊ शकतात. मोदीजींनी अयोध्येतील राम मंदिराचा विषय मार्गी लावला आहे. केदारनाथ येथे शंकराचार्यांचा पुतळा उभारून समाधीचे काम केले आहे, तसेच मंदिर परिसरात मोठी विकासकामे केली आहेत. ते एका पाठोपाठ एका मंदिराचे काम करत आहेत. हा त्यांचा भावनिक अजेंडा आहे.

## नवीन पनवेल येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून महापालिका क्षेत्राचा वेगाने विकास होत आहे. त्याअंतर्गत नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानात महापालिकेच्या माध्यामतून राजीव गांधी मैदानात 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र' सुरू होणार आहे. या कामाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. १२) भूमिपूजन झाले, तसेच या वेळी तामिळनाडूमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले देशाचे तिन्ही सैन्य दलाचे प्रमुख बिपीन रावत व सहकाऱ्यांना आदरांजली वाहण्यात आली.

पनवेल महापालिकेच्या स्थापनेपासूनच विविध सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून काम सुरू आहे. त्याअंतर्गत नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानात महापालिकेच्या माध्यमतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सात कोटी ८४ लाख रुपयांचे हे काम आहे. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समिती सभापती सुशीला घरत, समीर ठाकूर, नगरसेविका वृषाली वाघमारे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, शिवाजी भगत, बुवाशेठ भगत आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

## ठाकरे सरकारने युवकांच्या भवितव्याशी खेळ केला

### म्हाडा पेपरफुटीवरून विक्रांत पाटील यांचा हल्लाबोल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गुणांची हेराफेरी करून सत्तेवर बसलेल्या तिघाडी सरकारप्रमाणेच विद्यार्थ्यांनीही कोणत्याही परीक्षेस सामोरे जाऊ नये यासाठी परीक्षांचाच बट्ट्याबोळ करण्याचे शिक्षणविरोधी धोरण राबवून ठाकरे सरकारने राज्यातील लाखो उमेदवारांची फसवणूक केली आहे, असा थेट आरोप भाजपचे विक्रांत पाटील यांनी सोमवारी (दि. १३) पत्रकार परिषदेत केला. म्हाडाच्या परीक्षा रद्द करून सरकारनेच आपल्या भ्रष्टाचाराचा आणखी एक पुरावा जनतेसमोर आणला आहे, अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

महाराष्ट्रातील जनतेने नापास केलेल्या दोघांनी हेराफेरी केली आणि त्याला शिवसेनेने साथ दिली. जनतेचा निर्णय डावलून फसवणुकीने सत्तेवर आलेल्या या तीनही पक्षांची कोणत्याच परीक्षेस सामोरे जाण्याची हिंमत नाही. त्यामुळेच कसोटीच्या वेळी पळ काढून सरकारने राज्यातील विद्यार्थ्यांनाही परीक्षांपासून वंचित ठेवण्याचा कट आखून शिक्षणाचा बट्ट्याबोळ केला आहे. कोरोनाचे निमित्त करून शाळांना टाळे लावणाऱ्या तिघाडी सरकारने एमपीएससी परीक्षांमध्ये घोळ घातला. आरोग्य विभागाच्या भरती परीक्षांचे कंत्राटच नापास संस्थेला देऊन नामानिराळे राहत उमेदवारांनाही मनस्ताप दिला. आता म्हाडाच्या भरती परीक्षेत पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची लक्तरे बाहेर आल्याने ठाकरे सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याला काळे फासले आहे, असा आरोप या वेळी विक्रांत पाटील यांनी केला.

भ्रष्टाचारास खतपाणी घालणारे सरकार महाराष्ट्राच्या भावी पिढ्यांनाही भ्रष्ट करत आहे, असा आरोप त्यांनी केला. म्हाडाच्या भरती परीक्षा आता म्हाडामार्फतच घेण्याचा निर्णय म्हणजे वसुलीची मक्तेदारी स्वतःकडे ठेवण्याचा डाव आहे, असा संशय त्यांनी व्यक्त केला. जे सरकार स्वतःच प्रत्येक परीक्षेपासून पळ काढते, ते सरकार अशा परीक्षा कशा घेणार, असा सवाल करून, आरोग्य विभाग आणि म्हाडा परीक्षांच्या गोंधळामागे गंभीर गैरप्रकार उघड होत असल्याने त्यांची सीबीआयमार्फत चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीही विक्रांत पाटील यांनी केली आहे. सर्वच सरकारी खात्यात अंदाधुंदी माजलेली असताना मुख्यमंत्री ठाकरे मात्र मूग गिळून घरात बसले आहेत. भ्रष्टाचारास पाठिंबा देण्यासाठीच त्यांनी मौन पाळले आहे का, असा सवालही त्यांनी शेवटी केला.

## महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेतर्फे पनवेल पालिका आयुक्तांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेतर्फे पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांना नुकतेच निवेदन देण्यात आले. पनवेल महानगरपालिकेंतर्गत राहणाऱ्या कुष्ठपीडित नागरिकांच्या विविध समस्यांसंदर्भात हे निवेदन देण्यात आले आहे.



यामध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपीडितांना महापालिकेने प्रतिमहा रु. २५०० विशेष अनुदान मंजुरी देण्यात आलेली आहे, परंतु सध्याच्या वाढत्या महागाईमुळे मिळणाऱ्या अल्प रकमेतून त्यांच्या कुटुंबीयांची उपजीविका होणे शक्य होत नाही. म्हणून विशेष अनुदानात दरमहा किमान ५००० वाढ करावी. सन २००१च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या सुमारे २.६४% यापैकी सुमारे ८% लोकसंख्या ही कुष्ठपीडित आहे. त्यानुसार कुष्ठपीडितांना पंतप्रधान आवास योजनेचा लाभ देण्याचे आदेश आहेत, परंतु पनवेल महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपीडित बांधवांना या योजनेचा लाभ दिलेला नाही. तो लाभ लवकरात लवकर कुष्ठपीडितांना देण्यात यावा.

तसेच कुष्ठपीडित नागरिकांच्या मुला-मुलींना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार पनवेल महानगरपालिका सेवेमध्ये समाविष्ट करावे, अशा विविध मागण्यासंदर्भात हे निवेदन देण्यात आले. या वेळी संस्थेचे सल्लागार नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अध्यक्ष भूपाल फिरगाणे, सचिव अशोक आंबेकर, कुष्ठरोग तंत्रज्ञ अर्जुन ठाकूर, हर्षल जाधव, संजय जाधव आदी उपस्थित होते.

## भूपेंद्र पाटील यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून सोमवारी (दि. १३) साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्यांचे वाटप, तसेच पंचायत समिती शेष फंडातून करण्यात येणाऱ्या पेव्हर ब्लॉकच्या कामाचे उद्घाटन पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी भाजपचे ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, भूपेंद्र पाटील, राज पाटील, ज्येष्ठ नेते सदानंद पाटील, युवा मोर्चा ग्रामीण अध्यक्ष आनंद ढवळे, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, ज्ञानेश्वर पाटील, युवानेते यतीन पाटील, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिनेश भगत, सरचिटणीस उदय म्हस्कर, महेश केणी आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## घटस्फोट देत नसल्याने नवऱ्याचे डोके फोडले

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवऱ्यासोबत राहायचे नसल्याने नवऱ्याला घाबरवून घटस्फोट देण्यास भाग पाडण्यासाठी पत्नीने आणि तिच्या भावाने डोक्यात दगड मारून आणि चापटीने मारहाण करून दुखापत केल्याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की खाने आंबिवली येथे राहणारा निलेश कांबळे (वय ३२) व त्याच्या पत्नीचे पटत नसल्याने पत्नीला त्याच्याकडून घटस्फोट हवा होता. पती मात्र सोडचिठ्ठी देण्यास तयार नव्हता. यातच खाने आंबिवली बसस्टॉपजवळ पत्नी व तिचा भाऊ हे उभे असताना तिथे निलेश आला. या वेळी पत्नी व पत्नीच्या भावाने त्याला घाबरवून घटस्फोट देण्यासाठी डोक्यात दगड मारून जखमी केले व चापटीने मारहाण करून दुखापत केली. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरून

## पनवेलमध्येही ठिकठिकाणी थेट प्रक्षेपण

या कार्यक्रमाला प्रभाग समिती सभापती सुशिला घरत, हेमलता म्हात्रे, नगरसेवक राजू सोनी, नितीन पाटील, अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, ॲड. वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, भाजप जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, श्रीनंद पटवर्धन, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, गुरुनाथ लोंढे आदी उपस्थित होते.

सुकापूर येथील विठ्ठल मंदिरामध्ये या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, राज पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष आनंद ढवळे, सरपंच योगिता पाटील, प्रमोद भिंगारकर, किशोर सुरते, ज्ञानेश्वर पाटील, परशुराम पाटील, महेश पाटील, राजेश पाटील, उदय म्हस्कर, महेश केणी, जनार्दन पाटील, मधुकर पोपेटा, चाहु केणी, नारायण पाटील, ग्रामपंचायत सदस्य दिनेश भगत, पुष्पा म्हस्कर, अनिता पाटील, पूनम भगत, कविता पोपेटा, ज्योती केणी, माजी ग्रामपंचायत सदस्य वनीता पाटील, आनंद मुकादम, सुरेश मुकादम आदींसह रखमाई मंडळाचे सदस्य, महिला आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये बक्षीस व सत्कार समारंभ

या सोहळ्याला जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन तथा सभागृह नेते परेश ठाकूर, बॅडमिंटन रायगड असोसिएशनचे सचिव डेविड अल्वारीस, रवींद्र भगत यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या बॅडमिंटन स्पर्धेत सिद्धार्थ दास याने प्रथम क्रमांक व निशांत गलांडे याने द्वितीय क्रमांक पटकवला असून सर्व विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

## पनवेल मनपातर्फे भिंगारीत आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील नगारिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक उपक्रमांचे आयोजन करण्याते येत आहे. त्याअंतर्गत पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र १ मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन सोमवारी (दि. १३) कराडी समाज हॉल येथे करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक अजय बहिरा यांच्या हस्ते झाले.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत घेण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरात जनरल तपासणी, बीएमडी तपासणी, कोविड १९ प्रतिबंधक लसीकरण, रक्त तपासणी करण्यात आली. या सर्व तपासण्या तेरणा वैद्यकिय महाविद्यालयाच्या डॉक्टर्सच्या माध्यमातून करण्यात आल्या. याचबरोबर या ठिकाणी आलेल्या लाभार्थ्यांना डॉ. रेहाना मुजावर यांनी कुटुंब नियोजन, लहान मुलांचे लसीकरण, कोविड लसीकरणाविषयीचे महत्त्व पटवून सांगितले, तसेच या वेळी टीबी, लेप्रसी, मलेरिया याविषयी जनजागृती करण्यात आली. या वेळी मुख्य वैद्यकिय व आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, रघुनाथ बहिरा, जगदीश परदेशी, सुरज परदेशी, स्वप्नाली परदेशी, हारुण शेख, सीमा आर्य, संध्या मांगुरकर, आरती परदेशी, काशिनाथ परदेशी आदी उपस्थित होते.





**पनवेल : नावडे येथील साईबाबा मंदिराच्या उत्सवानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सदिच्छा भेट दिली व साईबाबांचे दर्शन घेतले. या वेळी दिनेश खानावकर, आशिष कडू, पवन भोईर, शिव पाटील आदी उपस्थित होते.**

## पनवेल महापालिकेकडून २४० रुग्णालयांना नोटिसा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत खाजगी रुग्णालये अधिक दर आकारत असल्याच्या तक्रारी येत असल्याकारणाने, रुग्णालयातून पुरविण्यात येणाऱ्या सुविधेचे दरपत्रक ७२ तासांमध्ये रुग्णालयाच्या दर्शनी भागात प्रदर्शित करून महापालिकेला अहवाल सादर करण्याच्या नोटिसा महापालिकेने २४० रुग्णालयांना दिल्या आहेत.

महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम १९७३ (सुधारित)नुसार सर्व रुग्णालयांनी दर्शनी भागात वैद्यकिय सुविधांचे दरपत्रक लावणे बंधनकारक आहे. जी रुग्णालये या नियमाची पूर्तता करणार नाहीत त्यांच्यावर बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९नुसार महापालिकेच्या वतीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा या नोटीसमध्ये देण्यात आला आहे.

## निवडक

### आजिवली परिसरात ट्रकची चोरी

**पनवेल :** २० लाख रुपये किमतीच्या टाटा कंपनीच्या १४ चाकी ट्रकची चोरी त्याच ट्रकच्या चालकाने केल्याची घटना आजिवली गावाच्या हद्दीतील एचपी पेट्रोल पंपाच्या बाजूला घडली. विनोद पवार यांच्या ट्रक (एमएच १३ एएक्स ४१०९) यावर चालक म्हणून काम करणारा अजिम सलीमखी पठाण याने २० लाख रूपये किमतीचा १४ चाकी ट्रक एका ठिकाणी उभा केला. त्यानंतर त्याने मालकाची फसवणूक करीत तो ट्रक चोरून नेला. त्यामुळे याबाबतची तक्रार तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### लज्जास्पद वर्तनप्रकरणी कारवाई

**पनवेल :** पनवेल एसटी स्टँड परिसरात रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या पादचारी लोकांना विभत्स चाळे, अश्लिल हावभाव व हातवारे करून असभ्य लज्जास्पद वर्तन करणाऱ्या चार जणींविरुद्ध पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. पादचारी लोकांना विभत्स चाळे, अश्लिल हावभाव व हातवारे करून असभ्य लज्जास्पद वर्तन करणाऱ्या महिलांविरुद्ध विविध महिला संस्थांनी व संघटनांनी शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार पोलिसांचे पथक व अ.मा.वा.प्र. कक्ष, गुन्हे शाखा आदींनी वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करीत चार महिलांना ताब्यात घेतले आहे.

### करंजाडेतून देशी दारूचा साठा हस्तगत

**पनवेल :** चहाच्या टपरीत विनापरवाना देशी दारूचा साठा करून त्याची विक्री करणाऱ्या महिलेवरूद्ध शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. तिच्याकडून दारूचा साठा हस्तगत केला आहे. करंजाडे येथील सेक्टर १ याठिकाणी एक महिला प्लॉट नंबर १५९ मधील बिल्डींगखाली चहाच्या टपरीमध्ये देशी संत्रा दारूचा साठा करून त्याची विक्री करत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना मिळाली. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक मोनाली चौधरी, शरद ढोले, हवालदार चेतन पाटील व प्रतिबंधक पथकाने छापा टाकून तेथून जवळपास १४४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### अवजड वाहनांवर कारवाई

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात अवैधरीत्या अवजड वाहनांची पार्किंग करणाऱ्या सहा जणांविरुद्ध तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे. तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात अनेक ठिकाणी अजवड वाहने उभी करण्यास परवानगी नाही आहे. त्यामुळे कित्येकदा अपघात होतात तसेच वाहतुकीस अडथळा होतो. याबाबत वारंवार सुचना करून सुद्धा वाहनचालक या सूचनांचे पालन करीत नाही. त्यामुळे तळोजा पोलिसांनी वाहतूक शाखेच्या मदतीने या भागात उभ्या केलेल्या ट्रेलर, टँकर अशा एकूण सहा वाहनचालकांवर कारवाई केली. यापुढेसुद्धा अशा प्रकारची कारवाई सुरू राहणार असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव यांनी दिली आहे.

# दूषित पाण्यामुळे कामोठेकर हैराण

## पिण्याच्या पाण्यात किडे आढळल्याने आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे वसाहतीला सिडकोद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. काही दिवसांपासून वसाहतीमधील सेक्टर १६ परिसरात नळाद्वारे येणाऱ्या पाण्यात किडे येत आहे. बारीक सुताच्या आकाराचे हे जंतू डोळ्यांनीही पाहता येत आहे. हे दूषित पाणी पिऊन आजारी पडण्यापेक्षा खिशाला कात्री लावून येथील नागरिक विकतचे पाणी घेत आहेत. दूषित पाणीपुरवठ्यामुळे येथील रहिवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.





कामोठे सेक्टर १६ परिसरात भूखंड क्रमांक ६ वर असलेल्या चॅनल कॉर्नर या इमारतीत ८५ सदनिका आहेत. सिडकोद्वारे केल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याद्वारे येथील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गरज भागवली जाते, मात्र काही महिन्यांपासून इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात दूषित पाणीपुरवठा केला जात आहे. पाण्यामध्ये जिवंत कीडे आढळून येऊ लागल्याने येथील रहिवाशांनी स्थानिक भाजप नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या माध्यमातून सिडको पाणीपुरवठा विभागाकडे स्वच्छ पाण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. रहिवासी आणि नगरसेवक डॉ. भगत यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत सिडकोकडून परिसरातील जलवाहिन्यांची पाहणी करून काही ठिकाणी दुरुस्तीही करण्यात आली, मात्र तरीसुद्धा परिस्थिती जैसे थे आहे. नळाद्वारे येत असलेल्या या पाण्यात किडे असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढून रहिवाशांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी पुरवण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक डॉ. भगत यांनी केली आहे.

सिडको पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी केलेल्या सूचनेनुसार इमारतीमधील टाक्या रहिवाशांनी दोन ते तीन वेळा स्वखर्चाने स्वच्छ करून घेतल्या आहेत. त्यानंतरही दूषित आणि कीडे असलेले पाणी येत आहे. आजारी पडण्याच्या भीतीने येथील रहिवासी विकतच्या पाण्याने तहान भागवत असल्याने त्यांच्यामध्ये संतापाचे वातावरण आहे.

चॅनल कॉर्नर इमारतीमधील रहिवासी करत असलेल्या तक्रारीनंतर शेजारील इमारतीमध्येही चौकशी केली. त्या वेळी या इमारतींनाही दूषित व अपुऱ्या स्वरूपात पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती भूखंड क्रमांक ६ वरील पुष्प कलश इमारतीमधील रहिवासी मनोज पाटील यांनी दिली. दूषित पाणी प्यायल्याने रहिवासी आजारी पडत आहेत. पुष्प कलश इमारतीमधील चार रहिवाशांना या पाण्यामुळे रविवारी (ता. १२) अतिसार सुरू झाल्याने उपचार घ्यावे लागले.

**"रहिवाशांच्या तक्रारीनंतर जलवाहिन्यांची तपासणी करण्यात आली. त्यात कोणताही दोष आढळला नसल्याने परिसरातील मलनि:सारण वाहिन्यांची तपासणी केली, मात्र त्यातही दोष आढळून आला नाही. त्यामुळे पुढील प्रयत्न पाणीपुरवठा विभाग करत आहे.**

**-सागर जगदाळे, पाणीपुरवठा विभाग, सिडको**

### *स्वच्छ पाणीपुरवठा करण्याची नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांची मागणी*

*पाण्यामध्ये किडे आढळल्याने येथील रहिवाशांनी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या माध्यमातून सिडको पाणीपुरवठा विभागाकडे स्वच्छ पाण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. रहिवासी आणि नगरसेवक डॉ. भगत यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत सिडकोकडून परिसरातील जलवाहिन्यांची पाहणी करून काही ठिकाणी दुरुस्तीही करण्यात आली, मात्र तरीसुद्धा परिस्थिती जैसे थे आहे. नागरिकांचे आरोग्य लक्षात घेता या परिस्थितीवर कायमस्वरूपी तोडगा काढून रहिवाशांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी पुरवण्यात यावे, अशी मागणी नगरसेवक डॉ. भगत यांनी केली आहे.*

## नवी मुंबईत सिग्नल तोडल्याने अपघात; एकाचा मृत्यू, पाच जण जखमी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिग्नल तोडून रस्ता ओलांडणाऱ्या रिक्षाला वाचवण्याच्या प्रयत्नात कारचा अपघात झाल्याची घटना पामबीच मार्गावर घडली. यामध्ये कारचालकाचा मृत्यू झाला असून इतर पाच जण जखमी झाले आहेत.

पामबीच मार्गावर अक्षर चौकात रविवारी (दि. १२) सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. वाशीकडून सीबीडीकडे जाणारी भरधाव कार अक्षर चौकात सिग्नल ओलांडत होती. त्या वेळी सिग्नल लागलेला असतानाही सिग्नल तोडून एक रिक्षा रस्ता ओलांडत होती. अचानक समोर आलेल्या रिक्षाला धडक टाळण्यासाठी कारचालकाने कार वळवली, मात्र कार अधिक वेगात असल्याने कारवर नियंत्रण मिळवता न आल्याने कारची रिक्षाला धडक बसली. त्यानंतर कार पाच ते सात वेळा उलटून घेऊन दुभाजक तोडून विरुद्ध दिशेच्या लेनवर जाऊन आदळली. या वेळी कारमध्ये चालकासह चार व्यक्ती होत्या असे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. त्यापैकी दोघे जण कार उलटत असतानाच कारमधून पडून जखमी झाले. अपघातामध्ये कारचालकाचा कारमध्येच चेंगरून मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. अपघातानंतर प्रत्यक्षदर्शींनी व पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे.

## शिवाजीनगरमध्ये अखंड हरिनाम सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री समर्थ सद्‌गुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशीर्वादाने शिवाजीनगर येथील बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंत्तीपर्यंत मार्गशीर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ ते १८ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

बाळसाहेब महाराज नंदेश्वर यांच्या हस्ते बाळकृष्ण महाराज यांच्या गुरूचरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोथ एकनाथ भागवत पारायण पर्वणीचा प्रारंभ गुरुवारी (दि. १६) होणार आहे. शनिवारी (दि. १८) दत्तजयंतीनिमित्त माऊलींवर पुष्पवृष्टी होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या भजन, प्रवचन, किर्तन या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.

कार्यक्रमाचे व्यवस्थापक शिवाजीनगर-गव्हाण-खारकोपर-न्हावे-न्हावेखाडी संचलीत देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) हे आहेत.

## नवी मुंबईत स्व. गोपीनाथ मुंडेंची जयंती



**नवी मुंबई : बातमीदार**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची ७१वी जयंती ऐरोली सेक्टर ४ येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज समाज मंदिर येथे साजरी करण्यात आली. या वेळी नवी मुंबईतील रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पालिकेचे विरोधी पक्षनेते विजय चौगुले, माजी आमदार मंगेश सांगळे, व्याख्याते पंढरीनाथ आंधळे, डॉ. अमोल गीते, ऐरोली सेक्टर ३ चे नगरसेवक अंकुश सोनवणे, बाळा केंद्रे, बाजीराव काकड यांनी स्वर्गीय मुंडे यांच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लटपटे यांनी भूषवले. कार्यक्रमासाठी सूर्यकांत मुंडे, राजेंद्र सांगळे, केंद्रे, दादासाहेब सोनवणे, दशरथ आव्हाड, अंबादास गोल्हार, भीमराव गर्जे, पराग वंजारी, किशोर कुटे, सुभाष शिरसाट, राजेंद्र केंद्रे, राजू घुगे, अशोक जाधवर या व्यतिरिक्त अनेक लोकांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगंबर वारे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता ह.भ.प. बाळू महाराज बडे यांनी ज्ञानोबारायांच्या प्रसायदानाने केली.

## गुळसुंद्यात महिलेचे दागिने लांबविले

**मोहोपाडा :** गुळसुंदे येथे सकाळच्या सुमारास महिलेच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून तिच्या गळ्यातील सोन्याची माळ खेचून चोरट्यांनी पोबारा केल्याची घटना घडली आहे.

गुळसुंदे येथील नूतन मोरेश्वर मोकल (वय ४८) ह्या सकाळच्या सुमारास रसायनी बसथांब्याकडे जात असताना अज्ञात चोरटा पाठीमागून धावत आला. त्याने नुतन यांच्या डोळ्यात मिरची पावडर लावून त्यांना धक्का देऊन खाली पाडले व गळ्यातील ४० हजार किमतीची १२,३३० ग्रॅम वजनाची सोन्याचे मणी असलेली माळ गळ्यातून खेचली. त्यानंतर तो पळून गेला. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून अधिक तपास सुरू आहे.



**कामोठे : लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनमित्त येथील आयोजित कार्यक्रमात पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन केले.**



**खारघर : डॉ. संदीप पटेल आणि डॉ. सोहेल ददान यांच्या सेक्टर १२ येथील पिक्सेल डायग्नोस्टिक अॅण्ड इमेजिंग सेंटरचे उद्‌घाटन पनवेल महापालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भांजी रावरीया, प्रवीण गामी, गणेश चौधरी, करमण वेरत, देवजी चौधरी आणि गजानन निकम उपस्थित होते.**



**नवीन पनवेल : तामिळनाडूमध्ये हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले देशाच्या तिन्ही सैन्य दलांचे प्रमुख (सीडीएस) बिपीन रावत व सहकाऱ्यांना युवती व युवकांनी सोमवारी आदरांजली अर्पण केली.**

## नवी मुंबईत खेळाडूंच्या मातांचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

येथील नेरूळ जिमखान्याच्या प्रांगणात शनिवारी (दि. ११) अखिल भारतीय क्रीडा भारती कोकण विभागाने कोकण प्रांतातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन केलेल्या खेळाडूंच्या नऊ मातांचा महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या उपाध्यक्षा शकुंतला खटावकर यांच्या हस्ते वीर जिजामाता पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

या वेळी नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा अधिकारी अभिलाषा म्हात्रे, क्रीडा भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्रीकांत धर्माधिकारी, कोषाध्यक्ष मिलिंद डांगे आदी उपस्थित होते. कबड्डी, जलतरण, जिम्नास्टिक्स, परा पॉवरलिफ्टिंग व शरीर सौष्ठव या खेळातील खेळाडूंच्या मातांचा, तसेच अभिलाषा म्हात्रे यांच्या मातेचाही सत्कार करण्यात आला.

खेळाडूंचे व्यक्तिमत्त्व घडवण्यात मोठे योगदान देणारी त्यांची आई कधी प्रकाशझोतात येत नाही. म्हणून खेळाडूंच्या मातांना वीर जिजामाता पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी यांनी केले. कार्यक्रमात नवी मुंबई परिसरातील क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय छात्र सेना (सह-३ महाराष्ट्र बटालियन युनिट व ८ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन युनिट) विभागाच्या वतीने वतीने ७३व्या राष्ट्रीय छात्र सेना दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या व्यक्तित्त्वात राष्ट्रसेवेची, राष्ट्रभक्तीची भावना रुजविण्याकरिता सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित कार्यक्रम भारतीय नौदलाचे निवृत्त अधिकारी कॅप्टन अमर सिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय सशस्त्र दलाचे प्रमुख जनरल बिपीन रावत यांना श्रद्धांजली अर्पण करीत झाली. तत्पश्चात राष्ट्रीय छात्र सेनेतील विद्यार्थ्यांनी सशस्त्र संचलन, सांस्कृतिक सादरीकरण, चित्तथरारक प्रात्याक्षिके आदींचे सुसादरीकरण केले.

या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, रोटरी क्लबचे अध्यक्ष तथा सदस्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, प्राध्यापक वृंद व पालक वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे सहयोगी अधिकारी कॅप्टन यू. टी. भंडारे आणि सी. टी. ओ. प्राध्यापिका नीलिमा तीदार यांनी विषेश परिश्रम घेतले.

प्रस्तुत आयोजनाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थ्येचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.




## पनवेलमधील मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पनवेल सेक्टर १०, प्लॉट नंबर २१ ग्रीन पार्क सोसायटी समोर येथे हे वसतीगृह कार्यरत आहे. येथे आठवीपासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास अनाथ व अपंग विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात वसतिगृह प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी अर्ज करावेत, असे आवाहन गृहपाल एम. जे. नरहरे यांनी केले आहे.

प्रवेशपात्र विद्यार्थिनींच्या पालकांचे सर्व मार्गांनी वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विद्यार्थिनींकरिता रुपये २ लाख ५० हजारच्या आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थिनींकरिता रुपये एक लाखाच्या आत असावे. ऑनलाइन प्रवेश अर्जासोबत तहसीलदार यांच्या सहीचा सन २०२१-२२ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्रक, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृहात प्रवेश अर्ज हे वसतिगृहात उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक वसतिगृहात अथवा ०२२२७४२२२२४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेलच्या गृहपाल एम. जे. नरहरे यांनी कळविले आहे.

## संपादकीय

# नाचक्की पर्व

गेल्या दोन वर्षांच्या महाविकास आघाडी सरकारच्या कारकिर्दीत महाराष्ट्राची राष्ट्रीय पातळीवर अनेकदा नाचक्की झाली. कायदा-सुव्यवस्थेपासून शिक्षण क्षेत्रापर्यंत सर्वच ठिकाणी इतकी बजबजपुरी माजली आहे की लोकांचा जीव अगदी विटून गेला आहे. या अनागोंदी कारभाराचा सर्वाधिक फटका पहिल्या इयत्तेपासून पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना बसला आहे. स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणारा तरुण वर्ग तर अक्षरश: हवालदिल झाला आहे.

**आरोग्य खात्याच्या भरती परीक्षेला पेपटफुटीचे गालबोट लागले. त्यात खुद्द आरोग्य मंत्र्यांचीच नाचक्की झाली. त्यापाठोपाठ म्हाडा प्राधिकरणाच्या भरती परीक्षेत ऐनवेळी पेपटफुटीची लक्षणे दिसू लागल्याने परीक्षाच रद्द करण्यात आली, परंतु यामुळे राज्याची नाचक्की मात्र टळली नाही. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी मध्यरात्री ट्वीट करून उद्या सकाळी होणारी परीक्षा रद्द होत असल्याचे जाहीर केले. या परीक्षेला राज्यभरातून सुमारे पावणेतीन लाख परीक्षार्थी बसले होते. परीक्षा रद्द झाल्याचे या परीक्षार्थींना परीक्षा केंद्रावर गेल्यावरच कळले. कारण मध्यरात्री एक वाजता गृहनिर्माणमंत्र्यांनी केलेले ट्वीट त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची काही शक्यताच नव्हती. पेपरफुटीची शंका आल्यामुळेच परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. परीक्षार्थींचे हित पाहूनच हे पाऊल उचलल्याचे समर्थन मंत्रीमहोदयांनी केले. या अनागोंदीला सरकारी यंत्रणेतील उदासीनता, ढिसाळ कारभार कारणीभूत आहेच, परंतु भरती प्रक्रियेकडे सरकारी यंत्रणा किती मुर्दाडपणाने पाहते याचेही हे उदाहरण आहे. या यंत्रणेकडे काही मापदंड आहेत की नाहीत आणि असतील तर ते गुंडाळून कुठे ठेवले आहेत असा प्रश्न उपस्थित होतो. बहुतेक सरकारी भरती परीक्षा या खाजगी संस्थांमार्फत घेतल्या जातात. स्पर्धा परीक्षांचे हे आऊटसोर्सिंग गेली अनेक वर्षे चालू आहे. पेपर काढण्यापासून निकाल लावण्यापर्यंत सर्व कामे याच संस्थांद्वारे करून घेतली जातात. या सर्व काळात सरकारी अधिकारी कुठे झोपा काढत असतात हे कळायला मार्ग नाही. यापुढे कुठल्याही बाहेरील संस्थांकडून परीक्षा प्रक्रियेची कामे करून घेतली जाणार नाहीत. म्हाडाची परीक्षा म्हाडाच घेईल असे आता गृहनिर्माण मंत्र्यांनी जाहीर केले आहे. त्यांची ही घोषणा वरकरणी स्तुत्य वाटते, परंतु अधिक खोलात जाऊन विचार केला असता, ती हास्यास्पद वाटू लागते. आऊटसोर्सिंग केलेल्या संस्थेवरती धड अंकुश न ठेवू शकणारे सरकारी अधिकारी स्वत: झडझडून कामे करून संपूर्ण परीक्षा प्रक्रिया पार पाडतील ही कल्पनाच विनोदी आहे. सरकारी यंत्रणा एवढी कार्यक्षम असती तर बाहेरील संस्थांना कामे देण्याची वेळच आली नसती. सरकारी नोकऱ्यांमधील भरती ग्रामीण भागातील युवकांना मोहात पाडते हे स्वाभाविकच आहे. त्यातील पगार, रोजगाराची हमी, भत्ते याचा मोह टाळता येण्याजोगा नसतो. त्यामुळे सरकारी पदांची संख्या दोन अंकी किंवा काही शेकड्यात असली तरी अर्जांची संख्या मात्र चार-पाच लाखांहून अधिक असते. आजच्या घडीला राज्य सरकारच्या विविध खात्यांमध्ये मिळून २० ते २५ हजारांवर पदे रिक्त आहेत. त्यावर भरघोस आश्वासने तेवढी मिळतात आणि खुर्ची टिकवण्याच्या राजकारणात सारे काही मागे पडते. युवकांच्या भविष्याशी निगडित असलेला भरतीविषयक परीक्षांचा प्रश्न मार्गी लावण्यामध्ये कोणालाही रस नाही हे खरे दुखणे आहे. या सगळ्या अनागोंदी कारभारामुळे महाराष्ट्राची नाचक्की होते ही खरी वेदना आहे.**

# चला, वीज वाचवू या!

आज १४ डिसेंबर, राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिवस माणसाच्या दैनंदिन जीवनातील ऊर्जेचे महत्त्व जाणून तसेच कमी ऊर्जा वापर, अधिक ऊर्जा बचत किंवा संरक्षण करण्यास जागरूक करण्यासाठी साजरा केला जातो.

ऊर्जेचा अनावश्यक वापर टाळून ऊर्जा संवर्धन करण्याची गरज आहे. भविष्यातील वापरासाठी ती जतन करणे तसेच उपलब्ध ऊर्जा कार्यक्षमतेने वापरणे अतिशय आवश्यक आहे. ऊर्जा संवर्धन योजनेत अधिक परिणाम मिळवण्यासाठी प्रत्येक संसाधनाच्या वापरात ऊर्जा संवर्धनाची नाळ रुजलेली असावी.

अनावश्यकपणे चालणारे पंखे, लाइट, हीटर, रोजच्या वापरातील कार टेप किंवा इतर इलेक्ट्रीक वस्तूंना जोडताना ही काळजी घेऊन ऊर्जा वाचवू शकतो. ऊर्जेचा अतिरिक्त वापर वाचवण्याकरिता ही अधिक सोपी व कार्यक्षम पद्धत आहे. ज्यामुळे आपण राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन मोहिमेत मोठी भूमिका बजावू शकतो.

सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत आपल्याला जसं अन्न, पाणी, हवा यांची गरज असते तसेच विजेचीही गरज असते. आपल्या दैनंदिन आयुष्यातली अर्ध्याहून अधिक कामे ही विजेवरच अवलंबून असतात. म्हणूनच विजेविना आपल्या जगण्याला अर्थच नाही. अशा या विजेची बचत केली नाही तर भविष्यात आपल्याला विजेचा तुटवडा जाणवेल. ऊर्जा बचतीसाठी खूप मोठं असं काही काम करावं लागत नाही किंवा खूप मोठा त्यागही करावा लागत नाही. वीजबचतीचे काही साधारण उपाय केले की वीज सहज वाचू शकते. प्रत्येकाने वीजबचत केली तर त्याचा फायदाच होणार.

आपला भारत देश हा कितीही प्रगत झाला असला तरी कित्येक खेडेगावांत आजही सुखसुविधांचा अभाव आहे. त्यातलीच एक सुविधा म्हणजे वीज. शहरी भागांत राहणारी मंडळी बऱ्याचदा विजेचा अपव्यय करतात. तो अपव्यय कमी केला आणि विजेची बचत केली तर अंधारात जीवन जगणाऱ्यांनासुद्धा वीज मिळेल. विज्ञानानुसार वीज निर्माण करावी लागते. वीज साठवून ठेवण्याच्या यंत्रणा महागड्या आहेत. विजेचं उत्पादन व वहन यासाठी लाखो मीटरच्या वाहिन्यांचं जाळं आणि उपकेंद्रं निर्माण करावी लागतात. ज्या धातूमधून वीज वाहून नेली जाते, त्या धातूमुळे काही प्रमाणात विजेची घट होते. याचाच अर्थ असा की, विजेचं वहन होत असताना, काही प्रमाणात वीज वाया जाते. यासाठी सगळ्यांनी विजेचा योग्य वापर केला तर विजेची बचत होईल. तसंच ज्यांच्या घरात वीज येत नाही, त्यांना वीज मिळेल. यासाठी सगळ्यांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. अगदी साध्या-सोप्या पद्धतींचा वापर करून वीज वाचवता येऊ शकेल.

घरात विजेचा वापर करताना आयएसआय प्रमाणित तारांचा तसेच ऊर्जा बचतीचं प्रमाणपत्र लाभलेल्या उपकरणांचाच वापर करावा. स्वस्त आणि दर्जाहीन तारांमुळे विजेचा सुयोग्य वापर होऊ शकत नाही. तसंच अशा तारांमुळे आग लागण्याची शक्यताही तितकीच असते. म्हणूनच प्रमाणित उपकरणे वापरली तर बचत होऊ शकते.

भारतात सूर्यप्रकाशाचं प्रमाण भरपूर आहे. त्यामुळे सोलार अर्थात सूर्याच्या प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करता येईल. मॉडर्न असणाऱ्यांना ही गोष्ट कदाचित पचनी पडणार नाही, पण आपल्या प्रयत्नांनी एखाद्याच्या घरातला अंधार दूर होत असेल तर हे प्रयत्न करायला काहीच हरकत नाही.

विजेची उपकरणं स्वच्छ असतील तरंच जास्त ऊर्जा मिळेल आणि विजेचा वापर कमी होईल. इस्त्रीची निवड करताना, ऑटोमॅटिक इस्त्री खरेदी करावी. जेणेकरून विशिष्ट तापमानाला इस्त्री बंद होईल. फ्रिजमधून वस्तू काढताना आवश्यक वस्तू एकदाच काढाव्यात, जेणेकरून फ्रिज सतत उघडावा लागणार नाही. सतत फ्रिज उघडल्याने फ्रिजचं तापमान बिघडतं आणि जास्त वीज खर्च होते. रेफ्रिजरेटर आणि भिंत यांच्यामधे पुरेशी जागा ठेवावी, जेणेकरून रेफ्रिजरेटरच्या भोवती हवा सहजपणे खेळती राहिल. रेफ्रिजरेटरमध्ये पदार्थ झाकून ठेवावेत. कारण झाकण न ठेवल्यामुळे अन्नातील बाष्प उडून जातं आणि कॉम्प्रेसरला अधिक कामं करावं लागतं.

कित्येक जण सायंकाळी दिवे लावतात आणि हे दिवे गरज नसतानासुद्धा रात्रभर चालू असतात. ज्या खोलीत कमी वावर असेल किंवा कोणीही नसेल त्या खोलीचे दिवे बंद करावेत. तसंच कित्येकदा एका खोलीत दोन दिवे, लॅम्प असतात, घराला आकर्षक बनवण्यासाठी या दिव्यांचा वापर केला जातो. असे अनावश्यक दिवे गरज नसल्यास बंद करावेत.

शहरातील काही भागात विद्युत पंपाने टाकीत पाणी चढवावं लागतं. बऱ्याचदा टाकी भरून वाहत असतानासुद्धा माणसं विद्युत पंप बंद करत नाही किंवा त्यांच्या लक्षातच राहत नाही. यामुळे पाण्याचा आणि विजेचा अपव्यय होतो. या समस्येसाठी बाजारात स्वयंचलित यंत्रणा मिळते. या यंत्रणेत पाण्याची टाकी भरली की विद्युत पंप बंद होतो. या यंत्रणेचा वापर केला तर हजारो युनीट वीज सहज वाचेल.

वॉशिंग मशीन, ओव्हन, रोटीमेकर यांसारख्या वस्तू वापरताना टायमरचा वापर करावा आणि टायमर वाजला की लगेच उपकरण बंद करावं. एसी, टीव्ही रिमोटने बंद केले जातात, पण त्याचा मेन स्विच बंद करण्यासाठी टंगळ मंगळ केली जाते. असं न करता रिमोटने टीव्ही, एसी बंद केल्यानंतर लगेचच मेन स्विच बंद करावा.

एसीचं बीलही जास्त येतं तसंच वीजही जास्त खर्च होते. काही जण एकदा एसी बसवल्यानंतर तो खराब होईपर्यंत त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. एसीकडे दुर्लक्ष न करता दर महिन्याला एसीचा फिल्टर तपासून, स्वच्छ करून घ्यावा. यामुळे थंडावा वाढेल आणि ऊर्जेचा वापर कमी होईल. एसी चालू असताना दरवाजा, खिडक्या व्यवस्थित बंद आहेत ना, याची खात्री करून घ्यावी. थंड हवा बाहेर जात असेल तर कुलिंग कमी होतं आणि जास्त ऊर्जा खर्च होते. एसीचा दिवसा वापर करताना तुमच्या खोलीमध्ये सूर्यप्रकाश येणार नाही याची काळजी घ्या. हो, पण तुम्हाला नैसर्गिक सूर्यप्रकाश हवा असेल तर खिडक्यांवर रिफ्लेक्टिव्ह फिल्मचा वापर करू शकता. अशा रिफ्लेक्टिव्ह फिल्मस प्रकाशाला अडथळा न आणता ४० ते ६० टक्के उष्णता कमी करतात. या उपयामुळे वीजही वाचेल आणि तुमची खोली प्रकाशित होईल. एसी सुरू असताना पंखेही चालू असतील तर हवा घरभर खेळती राहते. एसीची सर्व्हिसिंग वेळोवेळी करा. हल्ली सगळेच जण सीएफएल दिवे किंवा ट्युब्स वापरतात. कारण त्याने विजेची बचत होते. हे खरं आहे की सीएफएलमुळे वीज बचत होते, पण ही उपकरणं सुरुवातीच्या काही सेकंदात अधिक वीज खेचतात. सीएफएल ट्यूब सुरू केल्यानंतर जेवढी ऊर्जा खेचते, त्या ऊर्जेत ती नंतर दोन तास ऊर्जा देते. म्हणून सीएफएल दिवे, ट्युब लावल्यानंतर किमान तीन तास तरी तो बंद करू नये. जितक्या वेळा हे दिवे चालू बंद केले जातील तितक्या वेळ अधिक ऊर्जा खर्च होते आणि त्याचं आयुष्यही कमी होतं. त्यामुळे आधुनिक सीएफएल दिवे चालू केल्यावर जास्त वेळ ठेवा, तसंच गरज नसल्यास चालू करू नका.

ज्या उपकरणांमध्ये कॉइलचा वापर केला जातो ती सगळीच उपकरणं अधिक वीज खातात. त्यात सर्वाधिक वीज खाणारा म्हणजे पंखा. कित्येकांच्या घरी पंखा दिवस-रात्र चालू असतो. त्या पंख्याला जराही विश्रांती मिळत नाही. त्यामुळे पंखा जास्तीत जास्त ऊर्जा खेचून घेतो आणि त्याची हवा कमी लागते.

बऱ्याचदा देव्हाऱ्याचा झीरो बल्ब सतत सुरू असतो. झीरो बल्ब असला तरी हा बल्ब सुमारे १५ वॉटचा असतो. या झीरो बल्बपेक्षा सीएफएलचा तीन वॉल्टचा बल्ब लावावा. त्याचा उजेडही जास्त येतो. त्यामुळे वीजही फारशी खर्च होत नाही.

हल्ली सगळ्यांकडेच मोबाइल आहेत. अनेक जण मोबाइल चार्जिंगला लावून आपली कामं करतात. काम संपल्यानंतर किंवा मोबाइलची गरज भासल्यावर मोबाइल घ्यायला येतात, तोपर्यंत मोबाइल चार्ज होत असतो. बऱ्याचदा मोबाइल चार्ज झालेला असतो. फक्त दुर्लक्ष केल्यामुळे वीज उगाचच जळत असते. या पद्धतीमुळे वीज तर जळतेच तसंच मोबाइलही गरम होतो. अनेक जण मोबाइल चार्जिंगला ठेवल्यानंतर फोन आला की, बोलण्याच्या नादात चार्जिंगचं बटण बंद करायला विसरतात आणि फोन ठेवेपर्यंत चार्जिंग चालूच असतं आणि वीज खर्च होते. यातील काही मंडळी तर फोन आला की बटण बंद करायला विसरतातच आणि फोनवर बोलून झाल्यानंतर तो फोन पुन्हा चार्जिंगला ठेवत नाही आणि आपल्या कामाला लागतात. यामुळे चार्जर तर गरम होतोच तसंच वीज जळते.

आंघोळीसाठी पाणी गरम करताना गिझरचाच प्रामुख्याने वापर केला जातो. काही जणांना अगदी कडकडीत पाणी लागतं म्हणून आंघोळ होईपर्यंत गिझर चालू ठेवतात. यामुळे वीज खर्च होते. या गोष्टीला आळा बसण्यासाठी बादलीत एकदाच पाणी घ्यावं आणि गिझर लगेचच बंद करावा

# अलिबाग येथील लोकन्यायालयात १५ हजार ३०० प्रकरणे निकाली

## पक्षकारांना १६ कोटींची तडजोड रक्कम मिळवून देण्यात विधी प्राधिकरणाला यश

**अलिबाग : जिमाका**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशाप्रमाणे शनिवारी (दि. ११) अलिबाग येथे झालेल्या लोकन्यायालयात तब्बल १५ हजार ३०० प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात आली आहे.

रायगड जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा प्र. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण १६ कोटी ७४ लाख ७७ हजार ०८९ रुपये मूल्य असलेली एक लाख दोन हजार २५० प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व प्रलंबित प्रकरणांपैकी ६ कोटी ९८ लाख ९१ हजार ७७६ रुपये मूल्य असलेली १४ हजार ४२५ प्रकरणे, तसेच दाखल प्रकरणापैकी नऊ कोटी ७५ लाख ८५ हजार ३१३ रुपये मूल्य असलेली ८७५ प्रकरणे अशी एकूण एक लाख दोन हजार २५० पैकी १५,३०० प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली व त्यातून पक्षकारांना एकूण १६ कोटी ७४ लाख ७७ हजार ०८९ रूपयाची तडजोड



रक्कम मिळवून देण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयात लोक अदालती कक्ष स्थापन करण्यात आले होते. या लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनदेखील काही प्रकरणे मिटविण्यात आली.

हे लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक कार्यालय तसेच विधीज्ञ आणि सर्व पक्षकारांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे व विधी प्राधिकरणाचे सचिव संदीप स्वामी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

# विनयभंग प्रकरणी आरोपीला एक वर्ष कारावास आणि दंडाची शिक्षा

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**




एकट्या महिलेला रस्त्यात गाठून तिला शिवीगाळ करत विनयभंग करणाऱ्या प्रताप शंकर गुरव याला न्यायालयाने एक वर्ष कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंड न भरल्यास एक महिना सश्रम कारावासाची शिक्षा देखील सुनावण्यात आली आहे.

मार्च २०१४ मध्ये पीडित महिला ही तिच्या दुचाकीवरून चौक-कर्जत रस्त्याने घरी चालली होती. त्याच दरम्यान प्रताप गुरव याने त्याची दुचाकी आडवी घालत पीडित महिलेला थांबवली. तिला शिवीगाळ करत तिचा विनयभंग केला. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल होऊन न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाले होते. प्रथम वर्ग न्या. आर. डी. वाबळे यांच्यासमोर खटला सुनावणी आला होता. या केसमध्ये सहा महत्त्वाच्या साक्षीदारांचे जाबजबाब नोंदवून न्यायालयाने आरोपी प्रताप शंकर गुरव याला एक वर्ष कारावास आणि पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. सरकारी वकील म्हणून कल्पना फोंडके यांनी काम पाहिले.

# कर्जतच्या पराग बोरसे यांच्या चित्रांची चीनलाही भुरळ

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार पराग बोरसे यांच्या एका चित्राची निवड चीनमध्ये होणाऱ्या चित्रप्रदर्शनासाठी झाली आहे. जगातील नामांकित ५० चित्रकारांची चित्रे या प्रदर्शनांत मांडण्यात येणार आहेत.

चीनमधील पहिल्या किंग लियन २०२१ पेस्टल प्रदर्शन आणि सातव्या झूहाई शुतोंग स्टुडिओ पेस्टल आमंत्रित प्रदर्शनासाठी जगभरातून तेवीस चित्रकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. भारतातून आमंत्रित केले गेलेले पराग बोरसे हे एकमेव चित्रकार ठरले आहेत. या प्रदर्शनामध्ये चीनमधील ५५ आणि आंतरराष्ट्रीय २३ चित्रकारांचा समावेश आहे. वांझाई सिटीमधील लियन यीकिंग पेस्टल गॅलरी ऑफ फोकआर्ट सेंटरमध्ये हे चित्रप्रदर्शन २० डिसेंबरपर्यंत चालू राहणार आहे.

या प्रदर्शनामध्ये पराग बोरसे यांचे शोल्डरिंग द लव हे व्यक्तीचित्रण मांडण्यात आले आहे. शेळीच्या पिल्लाला आपल्या मुलाबाळांप्रमाणे खांद्यावर खेळवणाऱ्या एका वृद्ध धनगराचे हे चित्र आहे. या माणसाच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य आणि डोळ्यामधील वात्सल्यपूर्ण भाव हे या चित्राचे वैशिष्ट्य आहे. बोरसे यांच्या याच चित्राला यापूर्वीही पेस्टल जरनल अमेरिका या मॅगझीनने व्यक्तिचित्रणासाठीचा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तसेच या वर्षीच्या लोकसत्ताच्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर येण्याचा मानही या चित्राने मिळवला आहे. जगाच्या बाजारपेठेवर कब्जा करणाऱ्या चीनला पराग बोरसे यांचे चित्र आयात करावे लागल्याने बोरसे यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.




(छाया : संतोष पेरणे)

# जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांची मोठी गर्दी



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

राजपुरी येथील जंजिरा किल्ला पाहण्यासाठी रविवारी पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे खोरा बंदर येथील रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची तोबा गर्दी होती. राजपुरी नवीन जेट्टी येथेसुद्धा पर्यटकांची गर्दी दिसून आली.

सुट्टी असल्यामुळे रविवारी नाशिक, औरंगाबाद, कल्याण, डोंबिवली, बोरिवली, मुंबई, ठाणे आदी भागातील पर्यटक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या संख्येने आले होते. राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदर येथून पर्यटकांना शिडाच्या व मशीन बोटीद्वारे जंजिरा किल्ल्यावर नेले जाते. या भागात पर्यटक व त्यांच्या वाहनांची मोठी गर्दी झाली होती. किल्ल्याच्या परिसरात असणारी सर्व हॉटेल्स व छोट्या टपऱ्यांवरही पर्यटकांची गर्दी दिसून आली. त्यांना टप्याटप्याने होडीद्वारे जंजिरा किल्ल्यावर नेले जात होते. पर्यटकांची संख्या वाढल्याने शिडाच्या बोटींवर काम करणाऱ्या कामगारांची धावपळ उडाली होती. मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रकिनाऱ्यावरही पर्यटक व त्यांच्या वाहनांची गर्दी होती.

## करिअर गाईडन्सविषयी मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये रविवारी (दि. १२) करिअर गाईडन्सविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मुंबई येथील देवेंद्र साळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्वतःला कमी लेखू नये. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे अत्यंत गरीब घराण्यातील होते, परंतु ते राष्ट्रपती पदापर्यंत गेले, असेच आपणही नावलौकिक मिळवा, असे आवाहन देवेंद्र साळी यांनी या वेळी केले. संस्थेचे कार्यवाह नानासाहेब सावंत यांनी स्वागत केले. सामाजिक कार्यकर्ते शालिग्राम गायकवाड व प्राचार्य डॉ. संध्या कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

संजय चौधरी, अव्हाद जोशी, रामदास पुराणिक, प्रा. हर्षल जोशी, प्रा. माळी. अमित बाकडे यांच्यासह विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी याकार्यक्रमाला उपस्थित होते.

# कर्जतमध्ये स्व. गोपीनाथ मुंढे यांना अभिवादन

## शंभर लाभार्थ्यांना ई-श्रम कार्डचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते स्व. गोपीनाथ मुंढे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना रविवारी (दि.१२) किसान मोर्चाचे कोकण संपर्क प्रमुख सुनिल गोगटे यांच्या कर्जतमधील जनसेवा कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी सुमारे १०० लाभार्थींना ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले.



(छाया : विजय मांडे)

किसान मोर्चाचे कोकण संपर्क प्रमुख सुनील गोगटे, भाजपचे जिल्हा चिटणीस रमेश मुंढे, तालुका सरचिटणीस संजय कराळे, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष शिरीष कदम, महिला मोर्चा तालुका अध्यक्षा स्नेहा गोगटे, युवामोर्चाचे तालुका अध्यक्ष प्रमोद पाटील, शहर अध्यक्ष मयूर शितोळे, तालुका प्रज्ञा प्रकोष्ठचे समीर सोहोनी, तालुका सहकार आघाडी संयोजक मारुती जगताप, तालुका सोशल मीडिया संयोजक मिलिंद खंडागळे, प्रशांत उगले, सर्वेश गोगटे, श्रीनिवास राव, दिनेश गणेगा, हरिश्चंद मांडे, श्रुता पाटकर, भाऊ राठोड, अर्जुन घाडगे, पूनम डेरवणकर, वसंत जाधव आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इ श्रम कार्डचे लाभार्थी उपस्थित होते.

# १६ जागांसाठी ४५ अर्ज २३ जणांची माघार

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक २३ डिसेंबर रोजी होत असून, सदस्यपदासाठी एकूण ६८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. सोमवारी (दि.१३) अर्ज मागे घेण्याची मुदत संपण्यापुर्वी २३ उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आले. त्यामुळे आता सदस्यपदाच्या १६ जागांसाठी ४५उमेदवारी अर्ज शिल्लक राहिले आहेत.

खालापूर नगर पंचायत निवडणूक



खालापूर नगरपंचायतीच्या १७ पैकी एक प्रभाग ओबीसीसाठी राखीव होता. परंतु त्या ठिकाणी स्थगिती आल्यामुळे सोळा प्रभागात निवडणूक होणार आहे. भाजप, मनसे आणि शेकाप स्वबळावर निवडणूक रिंगणात उतरणार असल्याने निवडणुकीची रंगत वाढणार आहे.

# माणगावातील शिबिरात ४८ मुलांची नेत्रतपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा महाविद्यालयात शनिवारी (दि. ११) स्वदेश फाउंडेशन, एच. व्ही. फाउंडेशन आणि टिकमभाई मेथा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात ४८ मुलांची नेत्र तपासणी करण्यात आली.

मेथा महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व डीएलएलइ यांच्या सहकार्याने घेण्यात आलेल्या या शिबिरात माणगाव, म्हसळा, रोहा, श्रीवर्धन व महाड येथून आलेल्या ० ते १८ वयोगटातील एकूण ४८ मुलांची डॉ. हिमाली, डॉ. प्रियांका, डॉ. सुरुची व डॉ. शरीन यांनी अत्याधुनिक मशीनद्वारे नेत्र तपासणी केली. ज्यांना शस्त्रक्रियेची गरज आहे, त्यांची शस्त्रक्रिया स्वदेश फाउंडेशनतर्फे केली जाणार असून काहींना चष्मे दिले जातील असे फाउंडेशनचे डॉ. वाणी यांनी सांगितले.

संस्थेचे कार्यवाह नानासाहेब सावंत, विकास समितीचे अध्यक्ष रामदास पुराणिक, प्राचार्य डॉ. संध्या कुलकर्णी, प्रा. हर्षल जोशी, अमित बाकाडे आदी यावेळी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)

# माथेरानमधील 'त्या' हत्येचे रहस्य उलगडले

**कर्जत : बातमीदार**

माथेरानच्या इंदिरा गांधी नगरमधील एका खोलीत महिलेचा मृतदेह आढळून आला होता. चारित्र्याच्या संशयावरून या महिलेची हत्या तिच्या पतीनेच केली असल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले असून, रायगड पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने २४ तासांच्या आरोपीला नवीन पनवेल येथून ताब्यात घेतले आहे.





(छाया : संतोष पेरणे)

नवीन पनवेल येथे राहणारा तरुण रामसिलोचन पाल हा मुळचा उत्तर प्रदेशातील असून तो व्यवसायाने सॉफ्टवेअर इंजिनियर आहे. त्याचे मुंबई मालाड येथे राहणाऱ्या पूनम या तरुणीबरोबर मे २०२१मध्ये लग्न झाले होते, परंतु परिचारिका म्हणून सेवेत असलेल्या पूनम या आपल्या आईवडिलांकडे मालाड येथे राहून नोकरी करीत होत्या. सुटीला नवीन पनवेल येथील घरी ते दोघे एकत्र येत असत. एकत्र राहता येत नसल्याने दोघांमध्ये चिडचिड होत होती. एकांत मिळावा म्हणून ते दोघे शनिवारी (दि. ११) सायंकाळी माथेरान येथे आले होते. त्यावेळी राम सिलोचन पाल याने साई सदन लॉजमध्ये खोटी नाव नोंदणी केली होती. त्याने तेथे रात्री पत्नी पूनमचा गळा आवळला आणि नंतर धारदार चाकूच्या सहाय्याने गळा चिरून तिचे मुंडके बाजूला केले. रामसिलोचन याने रविवारी पहाटे रूम सोडली आणि सात वाजता नेरळ येथे पोहचला. त्यावेळी त्याने इंदिरानगर भागातील सखाराम तुकाराम पॉईंट येथील दरीमध्ये पत्नी पूनमचे मुंडके

**आरोपी २४ तासांत जेरबंद**

आणि कपडे फेकून दिले. विवस्त्र आणि मुंडके नसलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळून आल्याने माथेरानमध्ये खळबळ उडाली होती.

माथेरानचे सहायक पोलीस निरीक्षक संजय बांगर, उपनिरीक्षक केतन सांगळे यांच्यासह हवालदार अविनाश ठाकूर, महेंद्र राठोड, नाईक खतेले, राकेश काळे, सुनील पाटील, प्रशांत गायकवाड यांच्या पथकाने तपास सुरू केला. त्यांनी माथेरान इंदिरानगर आणि अमन लॉज तसेच दस्तुरी नाका येथील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात पुनमची पर्स आढळली. त्या पर्समध्ये असलेल्या चिठ्ठीमध्ये राम पाल याचा मोबाइल नंबर मिळाला. राम पालचे मोबाइल लोकेशन पाहून पोलीस पथक पनवेल येथे पोहचले. त्यांनी रविवारी रात्री साडेनऊ वाजता राम पाल याला ताब्यात घेतले आणि माथेरान येथे आणले. अधिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याने दिलेल्या माहितीवरून सोमवारी (दि. १३) सकाळी माथेरान पोलिसांच्या पथकाने पूनम पाल हिचे मुंडके हस्तगत केले.

# अलिबागमध्ये हृदयरोग तपासणी शिबिर

**अलिबाग : जिमाका**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, एसआरसीसी हॉस्पिटल-मुंबई आणि सत्य साई संजीवनी हॉस्पिटल-खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात शनिवारी (दि. ११) हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये हृदयविकार असणाऱ्या एकूण ४१ बालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २० बालकांना पुढील उपचारासाठी व शस्त्रक्रियेकरिता संदर्भित करण्यात आले आहे.

एसआरसीसी हॉस्पिटलच्या डॉ. स्नेहा जैन, व सत्य साई संजीवनी हॉस्पिटलच डॉ. आशिष बनपूरकर यांच्यासह जनसंपर्क अधिकारी डॉ. प्रचिती, गणेशकुमार भोसले, सुनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानदीप भोईर, ऐश्वर्या थळे तसेच आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी डॉ. संदेश, डॉ. निदा, डॉ. रश्मी व आरोग्य सेविका सई, स्वागता, प्रियांका हे उपस्थित होते.

हे शिबीर यशस्वी होण्याकरिता जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर, अधिसेविका जयश्री मोरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, जिल्हा लेखा व्यवस्थापक संतोष पाटील यांचे सहकार्य लाभले.

# पेणमध्ये एकाच रात्री आठ दुकाने फोडली

**पेण : प्रतिनिधी**

अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्रीत पेणमधील आठ दुकाने फोडून पोलिसांना आवाहन दिले आहे. मात्र दुकानदारांच्या हुशारीमुळे या चोरीमध्ये चोरट्यांच्या हाती फारसे काही लागले नाही.

रविवारी (दि. १२) रात्री अज्ञात चोरट्यांनी पेणमधील आठ दुकाने फोडली. त्यापैकी गांधी मंदिर येथील डिमोलोज केक शॉपमधील १० हजार रुपये, साईराज स्वीट अँड फरसाणमधील ८०० रुपये, गावंड गोडवील इंटर प्रायझेसमधील ११०० रुपये, उत्कर्षनगर येथील रिंग रोड जनरल स्टोअर्समधील ११ हजार ५०० रुपये, चिंतामण जनरल स्टोअर्स एक हजार रुपये, पेण नाक्यावरील जलाराम मेडिकल स्टोअर्समधील पाच हजार ४३५ रुपये, कोंबडपाडा येथील जय आईस्क्रीम पार्लर मधील एक मोबाईल व सात हजार असे एकूण १३ हजार रुपयाचा ऐवज, स्वरा कलेक्शनमधील एक हजार रुपये असे एकूण सुमारे ४३ हजार ९०० रुपयांची चोरी केली.




(छाया : अनिस मनियार)

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे. पेण-खोपोली रोडवर भर नाक्यावर असलेली दुकाने चोरटयांनी फोडल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे .

# पेणमध्ये दुचाकीची चोरी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील काळेश्री येथील अनिकेत पाटील यांनी त्यांची दुचाकी (एमएच-०६,बीझेड-९९३३) पेणमधील जुन्या बाजार समिती इमारतीच्या मागे उभी करुन ठेवली होती. ५० हजार रुपये किमतीची ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली.

या बाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार भोनकर करीत आहेत.


(मा. गोडसे सो)

प्रो. जमा १००/-

अर्जदारांकरीता ॲडव्होकेट
प्रशांत परशुराम वाघमारे

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज क्र. १३२०/२०२१
नि. १४/ड
ने.ता. ०६/०१/२०२२

१. कुमारी-वृषाली मिलींद शेंडे
वय-२३ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
२. कुमार-साहिल मिलींद शेंडे
वय-२१ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
दोघे राहणार :- बी/३-२, अमित को.ऑ. हौ. सो.,
प्लॉट नं.६, सेक्टर-१४, नवीन पनवेल,
पनवेल, महाराष्ट्र - ४१०२०६ .
} **अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की,

१. कै.चेतना मिलींद शेंडे यांचे दिनांक ०७/०४/२०२० रोजी टाटा हॉस्पिटल, परेल, मुंबई येथे मृत्यू झाला आहे. कै. चेतना मिलींद शेंडे यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार क्र. १ व २ हे कै. चेतना मिलींद शेंडे यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. कै. चेतना मिलींद शेंडे यांनी त्यांच्या मृत्यूपुर्वी खालील वर्णनित बचत खाते कर्नाळा नागरी सहाकारी बँक लि. पनवेल, नवीन पनवेल शाखा या बँकेमध्ये बचत खाते होते व आहे.

| बँकेचे नाव | शाखा | अकाउंट नं. | कस्टमर नं. | रक्कम रू |
|---|---|---|---|---|
| कर्नाळा नागरी सहकारी बँक लि. पनवेल. | नवीन पनवेल | ०२२०१०१०२ ०००३७९ | ८१९४१ | ७,४१,३०९/- |

३. सदर वरील वर्णनित जंगम मिळकतीचे सक्सेशन सर्टीफीकेट मिळणेकरीता वरील अर्जदार क्र.१ व क्र.२ यांनी मे. दिवाणी न्यायालय, पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

४. वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस सक्सेशन सर्टीफीकेट देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वत: अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे सक्सेशन सर्टीफीकेट प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक १३/१२/२०२१

**सही/-**
**लिपिक**
दिवाणी न्यायालय व स्तर

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
पनवेल दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल


# आर्ट ऑफ लिव्हिंगचे रायगडमध्ये चैतन्य अभियान

**रोहे : प्रतिनिधी**

श्री. श्री. रवीशंकर गुरूदेव यांच्या आशीर्वादाने आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून जिल्ह्यातील आठ तालुक्यात १० ते १२ डिसेंबर या कालावधीत रायगड पॅटर्न चैतन्य अभियान राबविण्यात आले. त्यास भरघोस प्रतिसाद लाभला.

डॉ. नामदेव घोलप व उदय भैय्या यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यातील इंदापूर, तळा, नागोठणे, कोलाड, रोहा, मुरूड, अलिबाग, पेझारी, पेण, नेरळ, कर्जत, खोपोली, पेडली, पाली येथील कोर्स केलेल्या साधकांना भेटून नवचैतन्य निर्माण करण्यात येत आहे. या सर्वच ठिकाणी ऑफलाइन नियमीत पाठपुरावा सुरू करून मकरसंक्रांत स्पेशल मेघा हॅप्पीनेस, १४ ऑनलाइन हॅप्पीनेस शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये रायगड जिल्यातील सर्व साधकांनी उत्स्फुर्त सहभाग घेऊन चैतन्य अभियान यशस्वी केले. पुढील आठवड्यात महाड, माणगाव तालुक्यात चैतन्य अभिमान राबविण्यात येणार आहे




(छाया : महादेव सरसंबे)

# पेण तरणखोप येथे घरफोडी

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील तरणखोप येथे घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी घरातील कपाटातून लाखोंचा ऐवज घेऊन पोबारा केला आहे.

फिर्यादी रुपेश गायकर (रा. तरणखोप) यांच्या घराच्या खिडकीची लोखंडी ग्रील उचकटुन शनिवारी १०.३० ते रविवारी रात्री १०.३० या वेळेत अज्ञात चोरट्याने प्रवेश केला. आणि बेडरुममधील कपाटातील एकूण पाच लाख सहा हजार ५९० रुपयांचे दागिने चोरून नेले.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ करीत आहेत.

# अलिबागमध्ये डोळ्याचा तिरळेपणा, अस्थिव्यंग शस्त्रक्रिया शिबिर

**अलिबाग : जिमाका**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, डिईआयसी कार्यक्रम व एसआरसीसी हॉस्पिटल-मुंबई तसेच सत्य साई संजीवनी हॉस्पिटल-खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयालयात शनिवारी (दि. ११) डोळ्यांचा तिरळेपणा व अस्थिव्यंग शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये डोळ्यांचा तिरळेपणा या आजारासंबंधी एकूण ३१ बालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २३ बालकांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले आहे. तर अस्थिव्यंग आजाराकरिता एकूण २८ बालकांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १३ बालकांना शस्त्रक्रियेकरीता संदर्भित करण्यात आले आहे. या लाभार्थ्यांच्या शस्त्रक्रिया मुंबईतील एसआरसीसी हॉस्पिटलमध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मोफत करण्यात येणार आहेत.

एसआरसीसी हॉस्पिटलच डॉ. जयदीप धमाले, डॉ. नहाल, डॉ. रत्नदीप, डॉ. निर्मित यांच्यासह जनसंपर्क अधिकारी योगेश खाचणे, जिल्हा सामान्य रुग्णालयातील डिईआयसी मॅनेजर गणेशकुमार भोसले, आरबीएसके समन्वयक सुनिल चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते साहिल म्हात्रे, ऐश्वर्या थळे यांच्यासह आरबीएसके पथकातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन गुंजकर, अधिसेविका जयश्री मोरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. चेतना पाटील, जिल्हा लेखा व्यवस्थापक संतोष पाटील यांनी हे शिबीर यशस्वी होण्याकरिता विशेष सहकार्य केले.

### विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धा

# उत्तराखंडला नमवून महाराष्ट्र विजयी



**राजकोट : वृत्तसंस्था**

अनुभवी फलंदाज अंकित बावणेने साकारलेल्या झुंजार शतकामुळे महाराष्ट्राने विजय हजारे करंडक एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत रविवारी उत्तराखंडचा चार गडी आणि एक चेंडू राखून पराभव केला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या उत्तराखंडने ५० षटकांत ६ बाद २५१ अशी धावसंख्या उभारली. मग चौथ्या क्रमांकावरील बावणेने १३२ चेंडूंत १२ चौकार आणि एका षटकारानिशी नाबाद ११३ धावांची खेळी करत एलिट ड-गटात महाराष्ट्राला चार सामन्यांत तिसरा विजय मिळवून दिला. उत्तराखंडने दिलेले २५२ धावांचे लक्ष्य महाराष्ट्राने ४९.५ षटकांत गाठले. कर्णधार ऋतुराज गायकवाड केवळ २१ धावा करून बाद झाला. महाराष्ट्राची ४ बाद ७५ अशी अवस्था असताना बावणेने नौशाद शेखच्या (४७) साथीने शतकी भागीदारी रचली. मग त्याने जगदीश झोपेसोबत (२२) सहाव्या गड्यासाठी ६२ धावांची भर घातली.

**संक्षिप्त धावफलक**

उत्तराखंड : ५० षटकांत ६ बाद २५१ (स्वप्निल सिंह ६६, तनुष गुसेन ५५; जगदीश झोपे २/४५) पराभूत वि. महाराष्ट्र : ४९.५ षटकांत ६ बाद २५२ (अंकित बावणे नाबाद ११३, नौशाद शेख ४७; स्वप्निल सिंह २/२०)

## मुंबईचे आव्हान साखळीतच संपुष्टात

**पुदुचेरी :** व्हीजेडी पद्धतीनुसार बंगालकडून ६७ धावांनी पराभव पत्करल्यामुळे गतविजेत्या मुंबईचे विजय हजारे करंडक क्रिकेट स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. मुंबईच्या संघाने एलिट ब-गटात साखळीमधील चार सामन्यांपैकी तीन सामने गमावल्यामुळे बाद फेरी गाठण्याच्या त्यांच्या आशा मावळल्या आहेत.

मुंबईने नाणेफेक जिंकल्यानंतर बंगालला प्रथम फलंदाजीची संधी दिली. बंगालने अनुस्तूप मजुमदार (११० धावा) आणि शाहबाझ अहमद (१०६ धावा) यांच्या शतकांच्या बळावर ५० षटकांत ७ बाद ३१८ धावा उभारल्या. त्यानंतर मुंबईने ४१ षटकांत ८ बाद २२३ धावा केल्या असताना पावसामुळे खेळ स्थगित करण्यात आला. त्यामुळे व्हीजेडी पद्धतीनुसार बंगालला ६७ धावांनी विजयी घोषित केले. बंगालच्या प्रदीप्ता प्रामाणिकने ३३ धावांत ३ बळी घेतले.

## आरोग्य प्रहर

## अंड्यांशिवाय या तीन पदार्थांतून भरपूर प्रथिने मिळतात

संडे हो या मंडे रोज खाओ अंडे ही म्हण तुम्ही लहानपणी ऐकली असेल, पण ही म्हण सगळ्यांना लागू पडणार नाही. असे काही लोक आहेत जे अंडी खात नाहीत, काहींना ते खाणे आवडत नाही आणि काही लोक आहेत ज्यांना अंड्याची ॲलर्जी आहे, मात्र अंडी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहेत यात शंका नाही. अंडी शाकाहारी आहारात गणली जात नाहीत. यामुळे शाकाहारी लोक अंडी खात नाहीत.



भारतातही काही लोकांना अंड्यांपासून ॲलर्जी आहे. काही लोकांना त्याचा वास आवडत नाही. अंड्यांमध्ये प्रथिने असतात आणि हे ॲलर्जीचे एक कारण आहे. ॲलर्जी व्यतिरिक्त काही लोक शाकाहारी असतात ते अंडी खात नाहीत. जर शाकाहारी व्यक्तीला प्रथिने मिळवायची असतील तर आम्ही तुम्हाला असे तीन पदार्थ सांगत आहोत जे अंड्यांसारखे पौष्टिक आहेत.

**शेंगदाणे :** खरं तर, भुईमूग विशेषतः हिवाळ्यात अंड्याची कमतरता पूर्ण करू शकते. शेंगदाण्यामध्ये प्रथिने, फॅट आणि फायबर मुबलक प्रमाणात असते, याशिवाय शेंगदाण्यात पॉलिफेनॉल, अँटी-ऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. हे लोह, नियासिन, फोलेट, कॅल्शियम आणि झिंकचा चांगला स्रोत आहे.

**सोयाबीन :** सोयाबीन हा प्रथिनांचा उत्तम स्रोत मानला जातो. शाकाहारी लोक त्यांच्या दैनंदिन आहारात सोयाबीनचा वापर करून प्रथिनांचे प्रमाण वाढवू शकतात. यामध्ये असलेले मिनरल्स, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि व्हिटॅमिन ए आरोग्यासाठी चांगले असतात.

**ब्रोकोली :** ब्रोकोली प्रथिनेयुक्त अन्नामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावते. प्रथिनाशिवाय ब्रोकोलीमध्ये कॅल्शियम, कार्बोहायड्रेट, लोह, व्हिटॅमिन-ए आणि व्हिटॅमिन-सी यांसह इतर अनेक पौष्टिक घटक असतात.

### राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

## ठाण्याच्या महिला संघाची अंतिम फेरीत पुण्याशी धडक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर अम्याचूर खो खो असोसिएशन यांच्या मान्यतेने ५७ वी पुरुष महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा वेळापूर (ता. माळशिरस), सोलापूर येथील पालखी मैदानावर सुरू आहे. पुण्याचे दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहचले असून अजिंक्यपदासाठी त्यांना मुंबई उपनगर व ठाण्याशी लढत द्यावी लागणार आहे.

वेळापूरच्या पालखी मैदानावर झालेल्या महिलांच्या उपांत्य सामन्यात गतविजेत्या पुण्याने उस्मानाबादला १५-१३ असे १:५० मिनिटे राखून नमविले. दुसऱ्या उपांत्य सामन्यात ठाण्याने रत्नागिरीस १४-११ असे हरविले. पुरुष उपांत्य सामन्यात पुण्याने सांगलीला २२-१८ असे नमविताना त्यांची बरीच दमछाक झाली. दुसऱ्या उपांत्य सामन्यात गतविजेत्या मुंबई उपनगरने शेजारच्या ठाण्याला १९-१८ असा १:३० मिनिटे राखून नमविताना कडवी लढत द्यावी लागली.

## हॉलिबॉल वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी भारतीय टीम कोचपदी शरद कदम यांची निवड



**खोपोली : प्रतिनिधी**

दुबई येथे २२ ते २७ डिसेंबर रोजी होणाऱ्या डायरेक्ट हॉलिबॉल वर्ल्ड चॅम्पियन २०२१ साठी भारतीय संघाचे कोच म्हणून शरद कदम यांची असोशिएशनने निवड केली आहे. भारतीय टीमच्या कोचपदी निवड झाल्यानंतर त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांच्या निवडीचे क्रीडाजगतात स्वागत करण्यात येत आहे.

शरद कदम हे खालापूर तालुक्यातील वनवटे गावचे रहिवासी आहेत. अनेक राष्ट्रीय कबड्डी स्पर्धांमधून त्यांनी राष्ट्रीय पंच म्हणून भूमिका बजावली आहे. त्यांनी अनेक राष्ट्रीय स्तरावरचे खेळाडू घडवले आहेत.

**डायरेक्ट हॉलिबॉल भारतीय संघ**

बिपिन कुमार चहल (कर्णधार), अंकुश पाठक (उपकर्णधार), बिरजू मलिक, सोहेब बेगमपूर, फुलचंद वाघ, चैतन मेहता, वसुधा गुंडे, अंकुर चौधरी, ओंकार चक्रनारायण, पवन कुमार.

## जयेश भोईर ‘सागरभाऊ शेळके श्री २०२१’ किताबाचा मानकरी




**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ‘सागरभाऊ शेळके श्री २०२१’ शरीर सौष्ठव स्पर्धेचे डिकसळ येथील प्रतीक्षा लॉन येथे करण्यात आले होते. या वेळी ऑलिम्पिया जिमचा जयेश भोईर या किताबाचा मानकरी ठरला, तर उत्कृष्ट पोझरचा मान रोशन खडे यांने मिळवला.

या वेळी सामाजिक कार्यकर्त्या ठमाबाई पवार, सविता पवार, वेटलिफ्टर बबन झोरे, मिस नवी मुंबई जान्हवी कदम, मुंबई पोलीस भरतीमध्ये प्रथम आलेली मनस्वी बडेकर, हर्षदा ठोंबरे, पूनम ठाकरे, योगेश शिर्के, कैलास हजारे, धनुर्विद्यामध्ये प्रावीण्य मिळवणारे डॉ. संतोष कुंभार, दुबई श्री किशोर शेट्टी, व्हॉलिबॉल प्रशिक्षक संतोष भोईर यांचाही गौरव करण्यात आला. स्पर्धेतील अन्य गटांतील ५५ किलो वजनी गटात नरेश चव्हाण, ६० किलो गटात योगेश बारसे, ६५ किलो गटात जयेश भोईर, ७० किलो गटात मोहन कांबरी, ७५ किलो गटात हर्षल मोरे यांनी वर्चस्व राखले.


वर्ष ३८ वे ॥ श्री बाळकृष्णाय नम: ॥ स्थापना १९८३

**मार्गशिर्ष शुध्द (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुध्दपोर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह**

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ मिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥
श्री स. स. प्रमिचैतन्य महाराज की जय ॥
गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई) | श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) पिताजी | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) माताजी

अनंत कोटी ब्रह्मांडनायक श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदीरामध्ये श्री. स. स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोध एकनाथ भागवत पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४३, गुरूवार दि. १६/१२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४३, दत्तजयंती शनिवार दि. १८/१२/२०२१ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**नित्याचे कार्यक्रम**

| | | |
|---|---|---|
| सकाळी | ५.०० ते ६.०० | काकड आरती |
| सकाळी | ६.०० ते ७.०० | श्री ची नित्यपुजा |
| सकाळी | ७.०० ते ९.०० | ग्रंथवाचन व ध्यान |
| सकाळी | ९.०० ते १०.०० | भजन |
| सकाळी | १०.०० ते १२.०० | प्रवचन |
| दुपारी | १२.०० ते १.०० | दुपारची आरती |
| संध्याकाळी | ५.०० ते ६.०० | ग्रंथ वाचन व ध्यान |
| संध्याकाळी | ६.०० ते ७.०० | संध्याकाळची आरती |
| रात्री | ७.०० ते ८.०० | ग्रंथ वाचन व ध्यान |
| रात्री | ९.०० ते ११.०० | भजन व किर्तन |

**दैनंदिन कार्यक्रम**

गुरूवार दिनांक १६/१२/२०२१

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० भजन | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, निनित ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल |
| सकाळी १० ते १२ प्रवचन | श्री. स.स.बाळासाहेब महाराज, नंदेश्वर<br>श्री. भागवत साहेब, पुणे,<br>ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळूण<br>श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी |
| दुपारी २ ते ४ भजन | भावभक्ती महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर<br>गायीका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती. हिरुबाई घरत,<br>सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत<br>श्री. गुरूकृपा प्रासदिक भजन मंडळ, खारकोपर<br>गायीका : सुप्रिया घरत<br>पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ भजन | श्री. विश्वंभर भजन मंडळ. गव्हाण<br>गायक : हेमंत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| सायं ८ ते ९ भजन | दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर<br>बुवा : वसंतशेठ पाटील (खारकोपर), देवानंद कोळी (गव्हाण)<br>पखवाज : बि. टी. कांबळे (गुरूजी) खारकोपर, गौरव म्हात्रे (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ किर्तन | श्री. ह.भ.प. एकनाथ महाराज पाटील (वाशी, नवी मुंबई) C.A. |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर भजन |

✻ व्यवस्थापक ✻
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर-गव्हाण- खारकोपर न्हावे - न्हावेखाडी (संचलित)

✻ संयोजक ✻
श्री. रामशेठ ठाकूर (मा. खासदार, रायगड) ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

✻ कार्यक्रमाचे स्थळ ✻
श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

(प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल, कार्यक्रमाच्या वेळेला महत्त्व दिले जाईल.)













दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com